MHAU030065552021

दाखल दिनांकः – ०४.०५.२०२१
नोंदणी दिनांकः – ०५.०५.२०२१
निकाल दिनांकः–०१.०७.२०२६
कालावधी – वर्षे महिने दिवस
०५ ०१ २७

औरंगाबाद येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.४) यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्रीमती व्ही. जे. कोरे)

(न्यायनिर्णय घोषीत दिनांक ०१.०७.२०२६)

(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७०४/२०२१)

(निशाणी क्र.७२)

	फिर्यादीचे नांव	:	राजर्षी शाहु मल्टी स्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी, लि. बुलडाणा, मुख्य कार्यालय, राजर्षी टॉवर, चिखली रोड, बुलडाणा, शाखा गारखेडा, मार्फत शाखा व्यवस्थापक, श्री. महेंद्र स्वरुपचंद राजपुत, वय: ३८ वर्ष, व्यवसाय: शाखा व्यवस्थापक, रा. प्लॉट नं.३५६, शॉप नं.५–६, सहयोग नगर, गारखेडा, औरंगाबाद.
	फिर्यादीतर्फे विधिज्ञ		श्री. गव्हाणे आर.यु.
	आरोपीचे नांव	:	श्री. रुकसाना बेगम अब्दुल सलिम, वय: ५८, व्यवसाय: व्यापार, रा. घर नं.१३/१, प्लॉट नं.३२६, सिल्क मिल्क कॉलनी, सलिम टॉवर जवळ, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद.
	आरोपीतर्फे विधिज्ञ		श्री. के.बी. दंताळ

भाग– ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

गुन्हा घडल्याचा दिनांक	१४.०४.२०२१
फिर्याद दाखल दिनांक	२५.०९.२०२०
गुन्ह्याचा सार सांगितल्याचा दिनांक	०५.०५.२०२१
पुरावा सुरु झाल्याचा दिनांक	११.०१.२०२३
न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक	निरंक
न्यायनिर्णयाचा दिनांक	०१.०७.२०२६
न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक	०१.०७.२०२६

आरोपीची माहिती

आरोपीचे क्रमांक	आरोपीचे नाव	अटक दिनांक	जामीनावर सोडल्याची तारीख	अधिनियम	अंतिम आदेश	दिलेली शिक्षा	फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set off) करण्याबाबत कालावधी
१.	रुकसाना बेगम अब्दुल सलिम	लागु नाही	१४.०६.२०२२	पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ प्रमाणे	दोषी	आरोपीस एक महिना साध्या कारावासाची शिक्षा आणि नुकसान भरपाई म्हणुन रक्कम २,५०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला दोन महिन्याच्या आत द्यावे व नुकसान	निरंक

						भरपाई न दिल्यास आरोपीस १५ दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे.	

न्यायनिर्णय

(दिनांक ०१.०७.२०२६)

०१) सदर खटला हा आरोपीविरुध्द पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ (संक्षिप्तपणे यापुढे याचा उल्लेख “सदर कायदा” असा केला जाईल.) चे कलम १३८ अन्वये चालविण्यात आला.

०२) फिर्यादी पतसंस्था ही मल्टी स्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी ॲक्ट २००२ अन्वये नोंदविलेली संस्था असुन जिचा नोंदणी क्र.८१९ असा आहे. संस्थेचे मुख्य कार्यालय, राजर्षी टॉवर, चिखली रोड, बुलडाणा येथे असुन शाखा गारखेडा, औरंगाबाद येथे आहे. फिर्यादी संस्था ही त्यांचे शाखा व्यवस्थापक, श्री. महेंद्र स्वरुपचंद राजपुत यांच्यामार्फत सदरची तक्रार दाखल करत असुन त्यांना दि.१०.१०.२०१८ रोजीच्या ठराव क्र.६१ अन्वये तक्रार दाखल करण्यास अधिकार दिले आहे. त्यांना सदर प्रकरणाची संपुर्ण माहिती असुन ते फिर्यादी संस्थेतर्फे प्राधिकृत अधिकारी आहेत. फिर्यादी पतसंस्था ही कर्ज पुरवठा करणारी व ठेवी स्वीकारण्याचा व्यवसाय करणारी संस्था आहे.

०३) फिर्यादी पतसंस्थेचे पुढे असे म्हणणे आहे की, आरोपी ही फिर्यादी पतसंस्थेची सभासद असुन तिला पैश्याची गरज असल्याने तिने फिर्यादी पतसंस्थेकडे रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र) च्या वैयक्तीक कर्जाची मागणी केली. आरोपीची गरज लक्षात घेता फिर्यादी पतसंस्थेने आरोपीला रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र) कर्ज मंजुर केले. त्यावेळी आरोपीने लागणारे आवश्यक ते करारनामा, वचन चिठ्ठी व इतर दस्त फिर्यादी पतसंस्थेच्या हक्कात करुन दिले. त्यानंतर फिर्यादी पतसंस्थेने सदरचे कर्ज दि.११.०९.२०१९ रोजी आरोपीच्या बचत खात्यामध्ये जमा केले.

०४) फिर्यादी पतसंस्थेचे पुढे असे म्हणणे आहे की, आरोपीने घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे फिर्यादी पतसंस्थेच्या वतीने वसुली अधिकारी यांनी आरोपीस वेळोवेळी कर्ज रकमेची मागणी केली असता आरोपीने फिर्यादी पतसंस्थेस थकीत कर्ज परत फेडीसाठी दि.०८.०३.२०२१ रोजी

तिच्या भारतीय स्टेट बँक, शाखा स्टेशन रोड, औरंगाबाद या बँकेचा धनादेश क्र.७४८७०३, रु.२,००,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख मात्र) चा दिला. त्यावेळी आरोपीने सदरचा धनादेश वटण्याची हमी फिर्यादी पतसंस्थेस दिली होती. त्यानुसार फिर्यादी पतसंस्थेने दि.०९.०३.२०२१ रोजी सदरचा धनादेश त्यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा गारखेडा, औरंगाबाद येथे वटण्यासाठी सादर केला असता सदरचा धनादेश हा दि.१०.०३.२०२१ रोजी 'अपर्याप्त निधी' या शेऱ्यानिशी न वटता अनादरीत झाला. त्यानंतर फिर्यादी पतसंस्थेने दि.३०.०३.२०२१ रोजी आरोपीस तिच्या योग्य त्या पत्यावर आर.पी.ए.डी. द्वारे त्यांच्या वकीलांमार्फत कायदेशीर नोटिस पाठविली व धनादेशावरील रक्कम १५ दिवसाचे आत देण्याची मागणी केली. सदरची नोटिस दि.३१.०३.२०२१ रोजी अपुर्ण पत्ता या कारणाने परत आली म्हणुन फिर्यादी पतसंस्थेने आरोपीविरुध्द सदरची फिर्याद दाखल केली.

०५) आरोपीस माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.२० अन्वये गुन्ह्याचा सार समजावुन सांगितला, तिने गुन्हा नाकबुल असल्याचे सांगुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. फिर्यादी पतसंस्थेच्या वतीने शाखा व्यवस्थापक श्री.महेंद्र स्वरुपचंद राजपुत यांनी नि.क्र.३३ अन्वये सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

०६) आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नि.क्र.६३ अन्वये नोंदविण्यात आला. त्यात तिने तिच्याविरुध्द फिर्यादी पतसंस्थेने खोटी केस दाखल केल्याचा बचाव घेतला.

०७) फिर्यादी पतसंस्थेनने दिलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन करण्यात आले. फिर्यादी पतसंस्थेच्या विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे नि.क्र.६९ अन्वये लेखी युक्तीवाद दाखल करण्यात आला आहे. त्याचे सखोल वाचन केले.

०८) आरोपीच्याविरुध्दचे अपराध सिध्द करण्याकरीता फिर्यादी पतसंस्थेने खालीलप्रमाणे पुरावा सादर केला व नि.क्र.५६ अन्वये आपला पुरावा बंद केला.

अ) तोंडी पुरावा–

अ. क्र.	साक्षीदारांची नावे	निशाणी क्रमांक
१.	श्री. महेंद्र स्वरुपचंद राजपुत (शाखा व्यवस्थापक)	३३

२.	श्री. संदीप नंदलाल वर्मा (लिपीक)	५२

ब) कागदोपत्री पुरावा–

अ. क्र.	तपशील	निशाणी क्रमांक
१.	फिर्यादी पतसंस्थेच्या ठरावाची प्रत	३४
२.	धनादेश क्र.७४८७०३	३५
३.	बँकचे सुचना पत्र	३६
४.	आरोपीला पाठविलेली कायदेशीर नोटिस	३७
५.	आर.पी.ए.डी. ची पावती	३८
६.	नोटिस परत आल्याचा बंद लिफाफा	३९
७.	कर्ज मागणी अर्जाची पडताळलेली प्रत	४०
८.	वचन चिठ्ठी	४१
९.	करारपत्र	४२
१०.	आरोपीचे कर्ज खाते व बचत खातेचे उतारे	५३ व ५४

०९) आरोपीने तिच्या बचावात कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. त्यामुळे नि.क्र.१ वर आदेश करुन आरोपीचा पुरावा बंद करण्यात आला.

१०) प्रस्तुत प्रकरणाची परिस्थिती विचारात घेता न्यायनिर्णयाच्या दृष्टीने खालील मुद्दे अवलोकनार्थ काढुन त्यावरील माझा निष्कर्ष मी खालीलप्रमाणे सकारण नोंदवित आहे.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	आरोपीने भारतीय स्टेट बँक, शाखा स्टेशन रोड, औरंगाबादचा धनादेश क्र.७४८७०३, दि.०८.०३.२०२१ रोजीचा फिर्यादी पतसंस्थेला कायदेशीर देय्य देण्यासाठी दिला, हे फिर्यादी पतसंस्थेने सिध्द केले का?	होकारार्थी
२.	सदरचा धनादेश "अपर्याप्त निधी" (Funds Insufficient)	

	या शेऱ्याने न वटता परत आला, हे फिर्यादी पतसंस्थेने सिध्द केले का?	होकारार्थी
३.	फिर्यादी पतसंस्थेने पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये पाठविलेली नोटिस आरोपीला मिळाली का?	होकारार्थी
४.	सदरची नोटिस आरोपीला मिळाल्यानंतर आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला धनादेशाची रक्कम दिली नाही आणि याद्वारे तिने पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये गुन्हा केला, हे फिर्यादी पतसंस्थेने सिध्द केले का ?	होकारार्थी
५.	काय आदेश ?	अंतिम आदेशाप्रमाणे

:– का र ण मि मां सा –:

मुद्दा क्र.१ करीता:

११) फिर्यादी पतसंस्थेचे शाखा व्यस्थापक श्री. महेंद्र स्वरुपचंद राजपुत यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.३३ वर दाखल करुन त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, आरोपी ही त्यांच्या संस्थेची सभासद असुन आरोपीला पैश्यांची गरज असल्याने तिने फिर्यादी संस्थेकडुन रक्कम रु.५,००,०००/– (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र) वैयक्तीक कर्जाची मागणी केली. आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला करारनामा, वचन चिठ्ठी व इतर कागदपत्रे नोंदवुन दिले. त्यानंतर आरोपीच्या मागणीनुसार कर्ज मंजुर करुन आरोपीच्या बचत खात्यामध्ये कर्ज जमा करण्यात आले. आरोपीने कर्जाची परतफेड न केल्याने फिर्यादी पतसंस्थेने वारंवार आरोपीकडे कर्ज रकमेची मागणी केली असता आरोपीने कर्ज परतफेडीसाठी दि.०८.०३.२०२१ रोजी वादातील धनादेश क्र.७४८७०३ (नि.क्र.३४) रक्कम रु.२,००,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख मात्र) चा भारतीय स्टेट बँक, शाखा स्टेशन रोड, औरंगाबादचा फिर्यादी पतसंस्थेस दिला. फिर्यादी पतसंस्थेने सदरचा धनादेश हा त्यांचे खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा गारखेडा, औरंगाबाद येथे वटण्यासाठी टाकला असता सदरचा धनादेश 'अपर्याप्त निधी' या कारणास्तव सुचना पत्र (नि.क्र.३६) सह दि.१०.०३.२०२१ रोजी न वटता परत आला. त्यानंतर आरोपीला धनादेशाच्या रकमेची मागणीची करणारी नोटिस (नि.क्र.३७) दि.३०.०३.२०२१ रोजी पाठविली. सदरच्या नोटीसनंतर देखील आरोपीने धनादेशाची रक्कम फिर्यादी

पतसंस्थेस दिली नाही म्हणुन फिर्यादी पतसंस्थेने आरोपीविरुध्द सदरची फिर्याद दाखल केली.

१२) वरील पुरावा बघता फिर्यादी पतसंस्थेने आरोपीविरुध्द दाखल केलेल्या पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ च्या तांत्रिक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. धनादेश कायदेशीर दायित्वासाठी देणे.
२. धनादेश बँकेत जमा करणे.
३. धनादेश न वटता परत येणे.
४. कायदेशीर नोटिसद्वारे धनादेशाच्या रकमेची मागणी करणे.
५. नोटिस मिळुनही धनादेशाची रक्कम परत न करणे.

फिर्यादी पतसंस्थेने पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या तांत्रीक बाबी सिध्द केल्यानंतर पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३९ अन्वये कायद्याचे गृहितके खंडण करण्याची जबाबदारी आरोपीवर असते व त्यासाठी आरोपीने न्यायालयासमक्ष मान्य करण्याजोगा पुरावा आणणे, गरजेचे असते.

१३) सदर खटल्यामध्ये आरोपीतर्फे फिर्यादीचा कसुन उलटतपास घेतला. सदर उलटतपासामध्ये फिर्यादी पतसंस्थेने आरोपीने जेव्हा कर्जाची मागणी केली तेव्हा आरोपीच्या घरी जाऊन चौकशी केली असल्याचे मान्य केले आहे. फिर्यादी पतसंस्थेने हे देखील मान्य केले आहे की, कर्ज प्रकरण हे २०१९ सालातील होते व त्या काळात कोविड-१९ या विषाणुचा प्रादुर्भाव होता. तसेच कोरोनाचा काळ ३ वर्षापर्यंत होता, हे देखील मान्य केले आहे. फिर्यादी पतसंस्थेने थकित काळातील कर्ज नियमित करुन घेतल्याचे देखील उलटतपासात सांगितलेले आहे. फिर्यादी पतसंस्थेने के.वाय.सी. वरुन संबंधीत व्यक्तीची आर्थिक पत कळत नसल्याचे मान्य केले आहे. आरोपीला कर्ज देतेवेळी आरोपीची मिळकत पत्रिका व त्यावर मालमत्तेचे गहाण खत करुन घेतल्याचे फिर्यादी पतसंस्थेने मान्य केले आहे. फिर्यादी पतसंस्थेने आरोपीने सुरक्षिततेपोटी दिलेल्या धनादेशाचा गैरवापर केल्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे.

१४) तसेच फिर्यादीतर्फे संदीप वर्मा (नि.क्र.५२) यांना तपासण्यात आलेले असुन सदर साक्षीदाराच्या साक्षीद्वारे फिर्यादी पतसंस्थेत आरोपीचा खाते उतारा (नि.क्र.५३) व बचत खात्याचा उतारा (नि.क्र.५४) ही कागदपत्रे सिध्द केलेली आहे. परंतु आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा कोणताही

उलटतपास घेण्यात आलेला नाही.

१५) सदर खटल्यामध्ये सादर करण्यात आलेल्या पुराव्याचे विवेचन केले असता असे दिसते की, आरोपीने कुठेही कर्ज घेतल्याचे नाकारलेले नाही. आरोपीच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये आरोपीला रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र) चे कर्ज मंजुर करण्यात आले परंतु प्रत्यक्षात फक्त रक्कम रु.४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पंचेचाळीस हजार मात्र) देण्यात आले, परंतु व्याज हे रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र) वर आकारण्यात आले. त्यामुळे आरोपी फिर्यादी पतसंस्थेस कायदेशीर देणे लागत नाही, असा बचाव घेतला आहे. परंतु फिर्यादीच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसते की, फिर्यादीने आरोपीला रक्कम रु.४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पंचेचाळीस हजार मात्र) कर्ज दिले कारण उर्वरीत रक्कम ही विमा हफ्ता, भाग भांडवल म्हणुन वजा करण्यात आली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमावलीप्रमाणे कोणतीही बँक/पतसंस्था विमा हफ्ता, भाग भांडवल इ. रकमा कर्ज रकमेतुन वजा करु शकतात आणि व्याज संपुर्ण कर्ज रकमेवर आकारु शकतात. त्यामुळे आरोपीचा बचाव की, व्याज हे संपुर्ण रकमेवर आकारण्यात आल्यामुळे आरोपी कायदेशीर देणे लागत नाही, हा बचाव मान्य करता येणार नाही.

१६) आरोपीतर्फे घेण्यात आलेला दुसरा बचाव असा आहे की, आरोपीने तारण म्हणुन किंवा सुरक्षिततेपोटी दिलेल्या धनादेशाचा फिर्यादी पतसंस्थेने गैरवापर केला आहे. जर आरोपीने धनादेश हे सुरक्षिततेपोटी दिले होते तर तिने तसे तिच्या बँकेला का कळविले नाही? किंवा धनादेश अनादरीत झाल्यानंतर फिर्यादी पतसंस्थेला त्याबाबत नोटिस का पाठविली नाही? किंवा फिर्यादी पतसंस्थेवर कोणतीही कारवाई का केली नाही?, याचा कोणताही खुलासा आरोपीतर्फे करण्यात आलेला नाही. आरोपीने घेतलेला बचाव हा मान्य करण्याजोगा नाही. उलटपक्षी, फिर्यादी पतसंस्थेने तोंडी व कागदोपत्री पुराव्याद्वारे वादातील धनादेश हा आरोपीने कायदेशीर दायित्वापोटी दिला आहे, हे सिध्द केले आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी 'होकारार्थी' देत आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीता:</u>

१७) फिर्यादी पतसंस्थेने धनादेश (नि.क्र.३५) हा वटण्यासाठी टाकला असता सदरचा धनादेश हा 'अपर्याप्त निधी' या कारणाने न वटता परत आल्याचे सुचना पत्रक (नि.क्र.३६) वर फिर्यादी

पतसंस्थेने दाखल केलेले आहे. सदर खटल्यामध्ये आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला उलटतपासादरम्यान नि.क्र.३६ बाबत कोणतीही सुचना दिलेली नाही अगर प्रश्न देखील विचारलेला नाही. सदरच्या नि.क्र.३६ वर बँकेचा शिक्का आहे. पराक्रम्य संलेख अधिनियम कलम १४६ नुसार सुचना पत्रावर शिक्का असल्यावर सदरचा धनादेश हा सुचना पत्रावर नमुद असलेल्या कारणास्तव अनादरीत झाल्याचे गृहितक निघते आणि सदरचे गृहितक हे आरोपीने खोडुन काढायचे असते. परंतु सदर खटल्यामध्ये आरोपी ही पराक्रम्य संलेख अधिनियम कलम १४६ अन्वये काढण्यात आलेल्या गृहितकाचे खंडण करु शकलेली नाही. सबब, मी मुद्दा क्र.२ चे उत्तर 'होकारार्थी' देत आहे.

मुद्दा क्र.३ करीता

१८) फिर्यादी पतसंस्थेने धनादेशाच्या रकमेची मागणी करणारी नोटिस (नि.क्र.३७) आरोपीला दि.३०.०३.२०२१ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे (नि.क्र.३८) पाठविलेली आहे. सदरच्या नोटिसीचा लिफाफा (नि.क्र.३९) हा आरोपीचा अपुर्ण पत्ता या कारणाने परत आलेला आहे. आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला उलटतपासादरम्यान तिला कसलीही नोटिस मिळाली नाही, अशी सुचना दिलेली आहे. परंतु सदरची नोटिस ही आरोपीच्या अचुक पत्यावर पाठविण्यात आलेली आहे. आरोपीचा नि.क्र.३९ वर नमुद असलेला पत्ता हाच पत्ता फिर्यादवर, आरोपीच्या वकील पत्रावर नमुद आहे व त्याच पत्यावर आरोपीला न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या गृहितकानुसार जर नोटिस आरोपीच्या अचुक पत्यावर पाठविण्यात आली आणि आरोपीने सदरची नोटिस घेण्यास नकार दिला किंवा अपुर्ण पत्ता दिला तर सदरच्या गृहितकानुसार आरोपीला नोटिस मिळाली, असा अन्वयार्थ काढता येतो. त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने कागदोपत्री पुराव्याद्वारे धनादेशाच्या रक्कमेची मागणी करणारी कायदेशीर नोटिस पाठविली होती, हे सिध्द होत आहे. सबब, मुद्दा क्र.३ चे उत्तर मी 'होकारार्थी' देत आहे.

मुद्दे क्र.४ व ५ करीता

१९) सदर खटल्यामध्ये फिर्यादी पतसंस्थेने आरोपीने त्यांना दिलेला धनादेश हा कायदेशीर दायित्वापोटी दिल्याचे सिध्द केलेले आहे. सदरचा धनादेश हा आरोपीच्या खात्यात 'अपर्याप्त निधी' या कारणाने न वटता परत आल्याने आरोपीला नोटिस देवुन फिर्यादी पतसंस्थेने धनादेशातील रकमेची मागणी केली. परंतु आरोपीने धनादेशाची रक्कम फिर्यादी पतसंस्थेस दिली नाही. त्यामुळे आरोपीने

पराक्रम्य संलेख अधिनियम,१८८१ चे कलम १३८ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मुद्दा क्र.४ करीता मी 'होकारार्थी' उत्तर देत आहे व शिक्षेवर म्हणणे ऐकण्यासाठी मी निकालपत्र येथे थांबवित आहे.

Digitally signed by VRUSHALI JAYESH KORE
Date: 2026.07.01 17:25:55 +0530

दि.०१.०७.२०२६ **(श्रीमती व्ही. जे. कोरे)**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.४), **औरंगाबाद**

२०) फिर्यादी व फिर्यादी पतसंस्थेचे वकील गैरहजर. आरोपीतर्फे न्यायालयामध्ये गैरहजेरीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. सकाळच्या सत्रामध्ये आरोपीचे वकील हजर परंतु ज्यावेळी दुपारच्या सत्रात आरोपीच्या वकीलांचा पुकारा करण्यात आला त्यावेळी आरोपीचे वकील न्यायालयासमक्ष गैरहजर. सबब, आरोपीला शिक्षेबद्दल काही सांगायचे नाही, असा अर्थ काढण्यात येत आहे.

२१) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५३(३) व ४१८(२) नुसार आरोपीच्या गैरहजेरीत देखील न्यायालय शिक्षा सुनावू शकते आणि शिक्षेचे अधिपत्र जारी करु शकते. त्यामुळे खटला अमर्यादीत काळासाठी प्रलंबित ठेवण्यात कोणताही अर्थ नाही. सदर खटल्यामध्ये आरोपीला खटल्याचे ज्ञान असुन देखील आरोपी ही हेतुपुरस्सर न्यायालयामध्ये गैरहजर राहिलेली आहे. त्यामुळे सदर खटल्याचा न्यायनिर्णय हा मी आरोपीच्या गैरहजेरीत देत आहे.

२२) गुन्ह्याचे स्वरुप पाहता सदर खटल्यात आरोपीस अपराधी परिविक्षा अधिनियम, १९६६ च्या कायद्यातील तरतुदीचा लाभ देणे उचित होणार नाही.

२३) दिवसेंदिवस धनादेश अनादरीत करण्याचे प्रमाण वाढत आहे. सदर खटल्यामध्ये आरोपीला धनादेश दिल्यापासुन खटला संपेपर्यंत अनेकवेळा धनादेशाची रक्कम फिर्यादीला देण्याची संधी होती, परंतु आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला धनादेशाची रक्कम दिलेली नाही. अशा परिस्थितीत धनादेश अनादरीत करण्याच्या हेतूने धनादेश देणे, या वृत्तीला आळा बसण्यासाठी आरोपीला शिक्षा देणे उचित ठरणार आहे. सदर खटल्यामध्ये आरोपीला एक महिना साध्या कारावासाची शिक्षा व नुकसान भरपाई रक्कम रु.२,५०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) ठोठविण्यात येत असुन

सदर नुकसान भरपाईची रक्कम न भरल्यास १५ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा देणे उचित होईल. सबब, मुद्दा क्र.५ साठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

आदेश

१. आरोपी रुकसाना बेगम अब्दुल सलिम हिस पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ च्या गुन्ह्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये एक महिना साध्या कारावासाची शिक्षा आणि नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रु.२,५०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) आरोपीने फिर्यादी पतसंस्थेला दोन महिन्याच्या आत द्यावे व नुकसान भरपाई न दिल्यास आरोपीस १५ दिवस साधा कारावास, अशी शिक्षा ठोठाविण्यात येत आहे.

२. आरोपीने जामीन बंधपत्र अभ्यार्पित करावे.

३. आरोपी अनुपस्थित राहिल्याने आणि शिक्षा स्थगित न केल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१८(१) नुसार शिक्षा भोगण्यासाठी सिध्द दोषी वॉरंट काढण्यात यावे.

४. सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला मोफत देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VRUSHALI JAYESH KORE
Date: 2026.07.01 17:26:05 +0530

दि.०१.०७.२०२६

(श्रीमती व्ही. जे. कोरे)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.४), **औरंगाबाद**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

लघुलेखकाचे नाव	:	श्री. युवराज भगवानसिंग मिरधे,
न्यायालयाचे नाव	:	अति. मुख्य न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.४), औरंगाबाद
न्यायनिर्णयाची तारीख	:	०१.०७.२०२६
न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख	:	०१.०७.२०२६
न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख	:	०१.०७.२०२६